# ससून रुग्णालयाला दोन कोटीचे अर्थसहाय्य

**पुणे** । पीव्हीसी पाईप्सच्या उत्पादनात भारतातील अग्रणी असलेल्या फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि त्यांचे सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाउंडेशन यांच्याकडून ससून सर्वोपचार रुग्णालयाला दोन कोटी रुपयांच्या अर्थसाहाय्यातून अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे देण्यात आली आहेत. येत्या १६ एप्रिलला नवजात शिशु अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) दुसऱ्या, तर एंडोस्कोपी युनिटच्या पहिल्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने या अद्ययावत यंत्रणेचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. एंडोस्कोपी युनिट आणि एनआयसीयू या विभागात ही अद्ययावत यंत्रणा बसविण्यात येत आहे. एंडोस्कोपी युनिटमध्ये किरणांपासून बचावासाठी अल्ट्रा साउंड विथ हेड प्रोटेक्शन, थायरॉईड शिल्ड,आदी उपकरणांचा समावेश आहे.